**अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींकरिता भंडारा येथे बांधकाम सुरु असलेल्या वसतीगृहास बांधकामाकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वसगृ -२०१५/प्र.क्र. ७०/का.८**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : १७ डिसेंबर, २०१५.**

**वाचा -**

१) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्र. मौआम-२००९/प्र.क्र.१५/का.८, दि.०२/०३/२०१०.
२) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्र. अविवि-२००९/प्र.क्र.१५(३)/का.८, दि.२४/०३/२०११.
३) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्र. अविवि-२००९/प्र.क्र.१५/का.८, दि.२५/०३/२०११.
४) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्र. वसगृ-२०१४/प्र.क्र.७२/का.८, दि.०७/१०/२०१४.
५) शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्र. वसगृ-२०१५/प्र.क्र.७४/का.८, दि.२५/०५/२०१५.
६) समक्रमांकाचे शासन निर्णय : दि.१०/०७/२०१५, दि.१०/०९/२०१५ व दि.१६/१२/२०१५.
७) शासन परिपत्रक क्रमांकः वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७/०४/२०१५.
८) शासन परिपत्रक क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्र. बियुडी-२०१४/प्र.क्र.१४८ (भाग-२)/का.७, दि.२१/०४/२०१५.
९) जिल्हाधिकारी, भंडारा यांचे कार्यालयीन पत्र क्र. कार्या-१२/अका-२/नपाप्र/कावि/१२५०/२०१५, दि.१५/१२/२०१५.

**प्रस्तावना -**

राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीसाठी वसतीगृहे बांधण्याबाबतचा शासन निर्णय, दि.२ मार्च, २०१० रोजी निर्गमित करण्यात आला आहे. अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी भंडारा येथे बांधण्यात येत असलेल्या वसतीगृहास संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये रु.३.२१ कोटीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता

देण्यात आली आहे. तसेच संदर्भ क्र.३ व ४ च्या शासन निर्णयान्वये अनुक्रमे रु.१.२५ कोटी व रु.१.५० कोटी असे एकूण रु.२.७५ कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, भंडारा यांना वसतीगृह बांधकामासाठी देण्यात आला आहे. संदर्भ क्र. ९ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, भंडारा यांनी सदर वसतीगृहासाठी रु.४६.०० लक्ष इतका उर्वरित निधी देण्याची विनंती केली आहे. त्याअनुषंगाने सदर वसतीगृहाच्या बांधकामाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

१. भंडारा येथे १०० मुलींच्या वसतीगृहाच्या बांधकामासाठी जिल्हाधिकारी, भंडारा यांना रु.४६,००,०००/- (रुपये शेहेचाळीस लाख फक्त) इतका निधी वितरीत करण्यास व त्यांना सदर रक्कम अर्थसंकल्प वितरण प्रणालीतून “आहरण व संवितरण” करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे. सदर तरतूद जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे सूपुर्द करण्यात येत आहे. याकरीता जिल्हाधिकारी, भंडारा हे “नियंत्रक अधिकारी” आणि त्यांनी प्राधिकृत केलेले दुय्यम अधिकारी “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून काम पाहतील. त्यांनी सदर निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, भंडारा यांचेकडे सूपुर्द करावा.

२. सदर निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र व त्याबाबतचा अहवाल इ. जिल्हाधिकारी, भंडारा यांनी शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करावे. तसेच अतिप्रदान व अखर्चित निधी परतावा शासनास भरणा (जमा) करण्याबाबत वित्त विभागाच्या दिनांक ०४ मार्च, २०१५ रोजीच्या परिपत्रकातील सूचनानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी. तसेच यापूर्वीचे उपयोगिता प्रमाणपत्र व महालेखापाल यांच्याशी ताळमेळ केल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय पुढील निधी वितरीत करण्यात येऊ नये.

३. सदरचा खर्च करण्यास वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत C.V.C. च्या मार्गदर्शक तत्वानुसार / CAG च्या निदेशानुसार कोणताही शासन निर्णय/अटी व शर्तींचा भंग होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी घ्यावी. सदर रक्कम वितरीत करण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे निरिक्षण अहवाल/वित्तीय कार्यपध्दती यांचा अवलंब करावा. तसेच सदर रक्कम चालू आर्थिक वर्षात उपयोगात आणणे आवश्यक राहील. सदर निधी कोणत्याही संस्थेत ठेव स्वरुपात जमा करता येणार नाही.

४. सदरचा खर्च मागणी क्रमांक झेडई-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (०८) शहरातील अल्पसंख्यांक समाजातील वसतीगृहाकरिता सहायक अनुदान (२२३५ ए १४२), ३१ सहायक अनुदान ( वेतनेतर ) या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध असलेल्या सन २०१५-१६ च्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक दि.१७/४/२०१५ यास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०१०२१०४६२५४७१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ainul C Attar
Digitally signed by Ainul C Attar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ainul C Attar
Date: 2016.01.02 11:11:24 +05'30'

**( अैनुल अत्तार )**
सहसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
२) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व परीक्षा ) मुंबई/नागपूर
३) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
५) जिल्हाधिकारी,भंडारा
६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, भंडारा
७) सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, पांचवा मजला, मुंबई
८) अवर सचिव, का.७, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की त्यांनी उक्त रकमा संबंधिताना कृपया B.D.S. वर उपलब्ध करुन देण्यात याव्यात.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, भंडारा.
१०) वित्त विभाग (अर्थसंकल्प-१४, व्यय-४) मंत्रालय, मुंबई.
११) नियोजन विभाग (कार्या.१४७५)
१२) निवड नस्ती, का.८